आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ११व्या आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सर्वत्र योगसाधना कार्यक्रमांचं आयोजन

- मुंबईत राज्यपाल तर पुण्यात मुख्यमंत्र्यांचा योगसत्रात सहभाग

- २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढ

**आणि**

- तेंडुलकर-अँडरसन चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची दमदार सुरुवात

**<><><><>**

११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन आज सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त उत्तराखंडमध्ये डेहराडूनमध्ये झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी झाल्या होत्या. योग ही निरोगी जीवन जगण्याची कला आहे, हा केवळ व्यायामाचा प्रकार नाही तर संतुलित जीवनशैलीचा आधार आहे असं त्या यावेळी म्हणाल्या. जागतिक समुदायात योग साधनेबद्दलचा आदर वाढला असल्याचंही त्यांनी यावेळी नमूद केलं.

योग साधनेनं आज संपूर्ण विश्वाला जोडलं आहे हे बघणं अत्यंत सुखद आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टणम मध्ये आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आयुष मंत्रालयाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ३ लाख योगसाधक सहभागी झाले होते.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उधमपूर इथं तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह अहमदाबाद इथं योग साधना कार्यक्रमात सहभागी झाले. तसंच देशभरातल्या जिल्हा मुख्यालयांमधे,

विद्यापीठं आणि सेवाभावी संस्थांमार्फत योग साधना कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात विविध मान्यवर सहभागी झाले.

**<><><><>**

सांस्कृतिक मंत्रालयानं महाराष्ट्रासह देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर आणि ५० सांस्कृतिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं. मुंबईजवळ कान्हेरी लेणी इथं आयोजित योग कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल सहभागी झाले. मुंबईतल्या घारापुरी लेणी, बुलडाण्यातलं गायमुख मंदिर, पुण्यातला आगा खान पॅलेस आणि शिवनेरी किल्ला, छत्रपती संभाजीनगरमध्ये बिबी का मकबरा तर अमरावतीत बौद्ध स्तूप इथं योग सत्रांचं आयोजन करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अजिंठा लेणी इथं भारतीय पुरातत्त्व खाते आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळानं संयुक्त पणे आयोजित केलेल्या योग शिबिरात पर्यटक आणि कर्मचाऱ्यांनी विविध योगासनं केली.

आजच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश-परदेशातून नोंदणी केलेल्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

**<><><><>**

योगदिनानिमित्त मुंबईत राजभवन इंथ आयोजित योगसत्रात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

राज्यात राजधानी मुंबईत झालेल्या योगदिन कार्यक्रमांचा संक्षिप्त आढावा आमच्या वार्ताहराकडून…

- **व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे -**

पंढरपूरची आषाढी वारी सुरु असतानाच आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होत आहे. पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी भक्तीयोग कार्यक्रमात वारकऱ्यांसोबत योग साधना केली. मंत्री चंद्रकांत पाटील आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

- **- - होल्ड- मुख्यमंत्री-**

नागपूरमध्ये यशवंत स्टेडियम इथं झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी योग साधना केली. आरोग्यदायी जीवनासाठी सर्वांनी योगाभ्यासाचा अंगिकार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

पुण्यात पंडित फार्म इथं आयोजित योगसत्रात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि चंद्रकांत पाटील सहभागी झाले.

भुसावळमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मंत्री गिरीश महाजन आणि संजय सावकारे यांच्या उपस्थितीत भव्य योगाभ्यास सत्र पार पडले. यात विद्यार्थी, शिक्षक आणि सामान्य नागरिकांसह १० हजार जणांनी योगसाधना केली.

सांगली जिल्ह्यातही भक्तियोग या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यात विक्रमी संख्येनं ५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवत विश्वविक्रम रचला. वारकऱ्यांनीही ताल धरत योगासनं केली.

कोल्हापूरातही जिल्हा प्रशासन आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयानं योग शालेय विद्यार्थ्यांसाठी योग सत्राचं आयोजन केलं होतं.

शिर्डीत साईबाबा संस्थानाच्या वतीनं द्वारावती भक्तनिवाससमोरच्या बागेत विशेष योग साधना कार्यक्रम आयोजित केला गेला.  अमरावतीतही केंद्रीय संचार ब्युरोच्या वतीनं विशेष योगसाधना सत्राचं आयोजन करण्यात आलं होतं.

नांदेड जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानं योग शिबीर घेण्यात आलं. भक्ती लॉन्स इथं राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर आणि आमदार बालाजी कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत योग शिबीर घेण्यात आलं.

लातूरमधे दरवर्षीप्रमाणे योगाचे महत्त्व सांगणारा संदेश देणारी रांगोळी शहरातल्या प्रमुख चौकासह सात ठिकाणी काढली आहे. वाशिम इथं जिल्हा प्रशासनाच्या वतीनं योग दिवस साजरा करण्यात आला.

रत्नागिरीतही जिल्हा परिषदेच्या वतीनं योगशिबिराचं आयोजन केलं गेलं.

पालघरमध्ये जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित कार्यक्रमात विविध योगासनांची प्रातिक्षिकं केली गेली.

नाशिकमध्येही महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला.

गडचिरोली गोंडवाना विद्यापीठात आयोजित योग शिबिरात खासदार डॉ.नामदेव किरसान यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले. जिल्ह्यात विविध उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयं आणि पोलिस ठाण्यांमध्येही योग शिबिरांचं आयोजन केलं गेलं.

धुळे जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात जिल्हा आणि सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांनी सर्वांना निरोगी जीवनासाठी योगाभ्यास करण्याचं आवाहन केलं.

अहिल्यानगरमध्ये, जिल्हा रुग्णालयात विशेष योगसत्राचं आयोजन करण्यात आलं होतं.

<><><><>

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १९ जूनपर्यंत देशाचं एकूण प्रत्यक्ष कर संकलन गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढून सुमारे ५ लाख ४५ हजार  कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. मात्र एकूण प्रत्यक्ष  कर संकलनात १ पूर्णांक ३९ शतांश टक्के किरकोळ घसरण नोंदवली गेली. ही घसरण प्रामुख्याने कर परताव्यात ५८ टक्के वाढ झाल्यामुळे आहे.

प्राप्तिकर विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या कालावधीत आगाऊ कर संकलन १ लाख ५५ हजार  कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं असून,  यात ३ पूर्णांक ८७ शतांश  टक्के वाढ झाली.

<><><><>

पंढरपूरच्या वारीसाठी निघालेल्या, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या आज पुण्यात मुक्कामाला आहेत. दोन्ही पालख्यांचं काल पुण्यात स्थानिकांनी पुष्पवृष्टी करून, रांगोळ्या काढून उत्साहात स्वागत केलं. राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्थांनी वारकऱ्यांच्या सेवार्थ अन्नदान आणि इतर उपक्रम राबवून आपली सेवा अर्पण केली. आज तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतल्या निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल. उद्या सकाळी दोन्ही पालख्या पंढरपूरकडे रवाना होतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

काल भवानी पेठेतल्या पालखी विठ्ठल मंदिरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचं दर्शन घेतलं आणि पालखीची पूजा  केली.

संत नामदेव महाराजांच्या दिंडीचं परभणी जिल्ह्यात आगमन झालं. नांदगाव आणि श्री क्षेत्र त्रिधारा इथं दिंडीचं स्वागत करण्यात आलं. पालखी आज परभणी शहरात मुक्कामी असून उद्या सकाळी गंगाखेडकडे मार्गस्थ होणार आहे. या वारीमध्ये ७०० पेक्षा अधिक भाविक२ अश्व सहभागी झाले आहेत.

<><><><>

इंग्लंडमधल्या हेडींग्ले इथं कालपासून भारत आणि इंग्लंड यांच्यात तेंडुलकर-अँडरसन चषक क्रिकेट कसोटी मालिकेला सुरुवात झाली. पाच सामन्यांच्या या मालिकेतल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवशी भारताच्या ३ बाद ३५९ धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. के एल राहुल ४२ धावांवर तर कसोटी पदार्पण करणारा साई सुदर्शन शून्यावर बाद झाला. सलामीवीर यशस्वी जयस्वालनं १०१ धावा केल्या तर कर्णधार शुभमन गिल १२७ आणि उपकर्णधार ऋषभ पंत ६५ धावांवर खेळत आहेत.

<><><><>

आज सकाळपासून रत्नागिरी तालुक्यात अधूनमधून अत्यंत जोरदार पावसाच्या सरी कोसळत असून खेडमधली जगबुडी नदी सध्या इशारा पातळीवरून वाहत आहे.

//<><><><>//